Shri Maharaj's Biography

श्री
रा
म

श्रीब्रह्मचैतन्य

गोंदवलेकर महाराज

चरित्र आणि वाङ्मय



श्री
रा
म

के. वि. बेलसरे

अनुक्रमणिका

प्रा. के. वि. बेलसरे यांची आणखी काही पुस्तके

- नाम साधना
- सहज समाधी
- आनन्द साधना
- परमार्थ प्रदीप
- श्रीचैतन्य गीता
- नामसमाधीचा अभ्यास
- श्रीदासबोधामृत
- अध्यात्म दर्शन
- अमृतपान भाग १ व २
- भावार्थ एकनाथी भागवत

दहावी आवृत्ती

मकरसंक्रात १५ जानेवारी १९८८

किंमत रु. ५०/- फक्त

प्रकाशक : द. म. टिळक, बुक सेलर्स पब्लिशिंग कंपनी,
मेहंदळे बिल्डिंग, गिरगांव, मुंबई - ४

मुद्रक : अ.वा. गोडसे, काशिका, चिंचवड, पुणे - ३३

लोकांना सुद्धां नंतर फार वाईट वाटलें आणि सर्वजण श्रीमहाराजांची क्षमा मागूं लागले.


गुरुकृपा : हा प्रसंग घडल्यावर श्रीमहाराज देहाभिमानशून्य झाले आहेत अशी तुकामाईंची खात्री झाली. येहळेगांवला येऊन श्रीमहाराजांना नऊ महिने झाले होते. या कालामध्यें त्यांना गोंदवल्याची किंवा आपल्या मातापित्यांची आठवण झाली नाही. गुरूच्या अखंड सेवेमध्यें ते स्वतःचें भान विसरले. त्यांच्या मनाचे व्यापार स्तब्ध झाले, भूक, तहान, झोंप, वगैरे देहधर्म सुटले, अंतःकरण पूर्ण निर्वासन झालें, आणि खऱ्या चित्तशुद्धीचें तेज त्यांच्या शरीरावर झळकूं लागलें.

लवकरच श्रीरामनवमी आली. आपल्याबरोबरच्या इतर मंडळींना तुकामाईंनीं उत्सवासाठीं उमरखेडला पाठवून दिलें. रामनवमीच्या दिवशीं भर उन्हांत दोघे गुरुशिष्य रानांत गेले. एका शेतामध्यें विहिरीवर दोघांनींहि स्नानें केलीं. एका अशोकवृक्षाखालीं तुकामाईंनीं श्रीमहाराजांना हात धरून आपल्या समोर बसवलें आणि बोलले, "मी तुला आजपर्यंत फार कष्ट दिले. पण पूर्वीं वसिष्ठांनीं रामचंद्राला जें दिलें तें मी तुला आज या क्षणीं देतों !" असें सांगून त्यांनी श्रीमहाराजांच्या डोक्यावर हात ठेवला. श्रीमहाराजांना तत्काळ समाधि लागली. पुष्कळ वेळांनंतर जेव्हां समाधि उतरली तेव्हां तुकामाईंनीं त्यांचे "ब्रह्मचैतन्य' असे नांव ठेवलें, आणि त्यांना अत्यंत प्रेमानें आलिंगन दिलें. "श्रीराम जय राम जय जय राम" हा त्रयोदशाक्षरी मंत्र जपून रामोपासना करावी असें सांगून तुकामाईंनीं श्रीमहाराजांना रामदासी दीक्षा दिली व अनुग्रह देण्याचा अधिकार दिला. " प्रापंचिक लोकांना–विशेषतः मध्यम स्थितींतल्या लोकांना–आपल्या प्रपंचामध्येंच परमार्थ कसा करावा हें शिकव. राममंदिरांची स्थापना करून राम-नामाचा प्रसार कर. माझें महत्त्व वाढविण्यापेक्षां श्रीसमर्थांचें महत्त्व वाढव. लोकांमध्ये भजनाचे प्रेम उपन्न होईल असा मार्ग दाखव. जे खरे दीन असतील त्यांची सेवा कर, आणि सर्व ठिकाणीं प्रेम वाढेल असा उपाय कर." इतक्या गोष्टी श्रीमहाराजांना तुकामाईंनीं करण्यास सांगितल्या. या वेळीं सूर्य बरोबर डोक्यावर आला होता, आणि मग दोघेजण घरीं परत आले.

☆ ☆

यमुनाबाईंनी आपला देह चंदनासारखा झिजवला. वृद्धापकाळाने क्षीणता आल्यावर अनेक रोगांनी त्यांचे शरीर जर्जर होऊन गेलें, तेव्हां त्या म्हणूं लागल्या, ' महाराजांनीं माझी प्रत्येक इच्छा पुरवली. आता मला कशाचीही अपेक्षा नाहीं. एकच [illegible] आता उरलें – ' त्यांच्या ' मांडीवर डोकें ठेवून शेवटची झोंप घ्यायची ! महाराजांनीं फार कल्याण केलें आहे. पण नियति निराळी होती. तात्यासाहेब आधी गेले. सन १९६७ च्या एप्रिलमध्ये तात्यासाहेबांनीं दवाखान्यात देह ठेवला. यमुनाबाई घरींच होत्या. त्यांच्या कानावर ती वार्ता घातली तेव्हां त्यांच्या तोंडून पहिले शब्द निघाले ते असे, ' महाराजांची इच्छा ! त्यांनीं माझें लग्न करून मला घरांत आणले ; माझा संसारही त्यांनींच केला ; हा प्रसंगही त्यांनींच आणला. बरें ! दुसऱ्या दिवसापासून, भेटायला येणाऱ्यांना जेऊन जाण्यास त्या नेहमींप्रमाणें सांगत. मोठमोठ्या साधकांना लाजविणारी त्यांची ही निष्ठा पाहून मन थक्क होतें. पुढें त्या पावणेंदोन वर्षे जगल्या, पण अखंड नामस्मरणांत असत. मोठमोठ्या मठपतींना आणि वेदांत्यांना लाजवील असें खरें समाधान त्यांच्यापाशी होते. ठेविले अनंतें तैसेंचि राहावें । चित्तीं असो द्यावें समाधान ।। याचें त्या मूर्तिमंत उदाहरण होत्या.

श्रीमहाराजांच्या कृपेनें पुष्कळ माणसें तयार झालीं. हुबळीचें सच्चिदानंदबुवा, कुरवलीचे दामोदरबुवा, कऱ्हाडचे शांताश्रम, आटपाडीचे विश्वनाथबुवा, मारुतीराव पिटके, वामनराव आपटे, वगैरे आणखी पुष्कळ चांगले चांगले साधक होऊन गेले. प्रत्येकाच्या बाबतींत दोन गोष्टी प्रामुख्यानें आढळतात. श्रीमहाराजांच्यावर पूर्ण निष्ठा, आणि अखंड नामस्मरण. त्यांच्या सर्व शिष्यांची गणती करणें आकाशातल्या चांदण्या मोजण्याइतकेंच वेडेपणाचें होईल. त्यांनीं अक्षरशः अनंत लोकांच्या हृदयांतील स्फुलिंगाला चेतना दिली. धन्य अशा महात्म्याचें जीवन !



१६. नंतरची व्यवस्था

देह ठेवावयाच्या अगोदर सुमारें एक वर्ष श्रीमहाराजांनीं सर्वांच्या सांगण्यावरून एक मृत्युपत्र करून ठेवलें होतें. त्यांनीं देह ठेवल्यावर मृत्युपत्रांत लिहिल्याप्रमाणें सगळी व्यवस्था करण्यांत आली. समाधीची व मंदिरांची एकंदर व्यवस्था पहाण्यास पंच नेमले. त्यांचीं नांवें अशीं–पहिले व मुख्य पंच श्रीमहाराज;



सरपंच श्रीब्रह्मानंद; कार्यकारी पंच श्री. अप्पासाहेब भडगांवकर, श्री. बापूसाहेब साठये आणि श्री. तात्या चपळगांवकर हे व इतर दोघे पंच होते. श्री. तात्यासाहेब दामले आरंभीं पंच नसले तरी श्रीब्रह्मानंदाचें सरचिटणीस म्हणून काम पहात असत. श्रीआईसाहेबांना महिना पंचवीस रुपये तहहयात देण्याची व्यवस्था करण्यांत आली. भाऊसाहेब केतकर यांनीं पंचासाठीं एक वर्षभर गोंदवल्याचीं सगळी व्यवस्था बघितली. नंतर पंच ती बघूं लागले.

श्रीआनंदसागरांच्या अस्थि श्रीमहाराजांनीं पूर्वीं हर्द्यास ठेवल्या होत्या. 'मी, स्वत: त्या बरोबर नेईन' असें त्यावेळीं श्रीमहाराज बोलले होते. योग असा आल[illegible] कीं हरिपंत मास्तरांनीं श्रीमहाराज व श्रीआनंदसागर या गुरुशिष्यांच्या अ[illegible] बरोबरच नेऊन प्रयागच्या त्रिवेणीसंगमांत विसर्जन केल्या. इकडें कृष्णेमध्येंदे[illegible]